Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# उपेक्षितांची कविता

**डॉ. पी. जी. रानमाळ**
विभागप्रमुख, मराठी विभाग,
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

'वडारवाडी' ही कवी परशुराम गिमेकरांची कविता मराठी साहित्यात उपेक्षितांचे दुःख वेदना मांडणारी आहे. उपेक्षितांचे हे पहिले खंडकाव्य असावे. ही कविता उपेक्षित वडार समाजाची जीवनव्यवस्था कथात्मकपणे मांडताना दिसते. दगडाला देवपण देऊन स्वतः मात्र दुःख वेदनामय जीवन जगणाऱ्या माणसाची कथा सांगणारी 'वडारवाडी' होय.

आज इथं उद्या तिथं अशी भटकंती करत दगडाला घाव घालून त्यात देवपण निर्माण करणारा असा हा वडार समाज गावोगाव आजही फिरताना दिसत आहे. ज्या समाजाचे माणूस म्हणून अन्न, वस्त्र, निवारा हे मूलभूत प्रश्न स्वातंत्र्यानंतरही आजही पूर्ण झालेले नाहीत. गाढवासारखे जिणे ज्याच्या वाट्याला आलेले आहे. अशा उपेक्षित माणसाची कथा आणि व्यथा मांडणारी डॉ. परशुराम गिमेकर या कवीची 'वडारवाडी' ही कविता आहे.

आदिमतेशी जगणं ज्यांच्या वाट्याला आले आहे, अशा या वडार समाजाचे जगणे दगडाशी साथ-संगत जोडत गेले आहे. निर्जीव दगडाप्रमाणे आयुष्य या माणसांच्या वाट्याला आले. कवी 'अश्मयुगीन जीवन' या कवितेत तीव्रपणे व्यथा मांडतात.

'दगडाची वाटी

दगडाचा तांब्या

दगडाचे हत्यार

दगडाचे आचार

तसे,

विचार दगडाचेच

अजूनही जगतो आम्ही

अश्मयुगीन जीवन

विसाव्या शतकात'

कवीने स्वातंत्र्यानंतरही वडार समाजाला 'माणूस' म्हणून जगणे वाट्याला आले नाही ही खंत व्यक्त केली. ज्यांची दखल घेतली जात नाही ते उपेक्षित व त्यांचे साहित्यही शापितांचे. गावगाड्याबाहेरील जगणे त्यांच्या वाट्याला आले. त्यांना जगणंच मुश्कील तिथं शिक्षण आणि साहित्य तर दूरची बाब. जन्मापासूनच वडार समाजाचे जगणे दुःखमय आहे. 'माझी टाळू' या कवितेत कवी वडारास जन्मल्यानंतर टाळू माखण्यास तेल तर मिळत नाहीच उलट लहानपणीच दगड डोक्यावर घ्यावा लागतात. बापाची शाबासकी म्हणून सुतकीचा दणकाच बसतो. मिठा-मिरच्यावर पाट्या-वरवंट्यावर जगणारी संस्कृती जोपासली पाहिजे, अशी परंपरा मानणारी वृत्ती मानवतेला लाजवणारी आहे.

'भुकेचा प्रश्न' महाभयंकर. 'वडार' माणूस आजही भोगतो आहे. एकीकडे दुसऱ्यासाठी दगडाला देवपण देणारा, दुसऱ्यासाठी इमारतीच्या बांधकामासाठी घाम गाळणारा पण स्वतः मात्र उपाशी जगणारा हा समाज आहे. शिल्पकलेतून, कैलास लेण्यातून मानवतेचे, श्रमाचे महत्त्व निर्माण करणारा हा उपेक्षित माणूस 'उंदरंच' तुझ्या हाती आले भाजीसाठी!' ही व्यथा मांडतो. त्यांचे दुःख माणसाला हेलावणारे आहे.

वडार समाजाला गाव नाही, निवारा नाही एवढेच नाही तर त्याचा जगण्याचा हक्क हिरावून घेतला गेलेला आहे. तिथेसुद्धा जातीचा वास येतो आहे. तो विषमतेवर आधारलेल्या समाजव्यवस्थेचा बळी ठरतो आहे. इतिहासाचाही तो बळी ठरतो आहे म्हणून कवी नव्याने इतिहास मांडण्याची आशावादी बंडखोर भूमिका व्यक्त करून नव्या मूल्यांचे आवाहनही करतो.

'हे इतिहासा,

आता

आम्ही आमचाच

इतिहास लिहणार आहोत

तुझ्या शेवटच्या पानापासून ते

आमच्या शेवटच्या पानापर्यंत'

कवी सबंध इतिहास बदलून मानवतेचा इतिहास रचला गेला पाहिजे ही भूमिका घेतो.

वडार समाज हा माळरानावर उघड्यावर जगणारा, कधी खोपटात, पालात फिरस्ता असणारा उपेक्षित उद्ध्वस्त झालेला असा. डॉ. परशुराम गिमेकरांनी 'वडारवाडी'त या समाजाची व्यथा चित्रित करून फार मोलाची कामगिरी केली आहे. अशा या समाजात गाडी वडार, जाती वडार आणि मातीवडार अशी पोटजातीची तटबंदी आहे. कवी त्यांना एकत्रतेचे आवाहनही करतात.

'माती वडारानो,

'माती' आपलीच आहे

गाडी वडारानो,

'वडारवाडी' आपलीच आहे

जाती वडारानो

जात आपली एकजातच आहे

म्हणून असे या एकत्र'

कवी असे आवाहन करून आपला इतिहास लिहिण्याचे सांगतात. हा इतिहास लेखणीतून निर्माण होईल अशी आश्वासक जाणीव 'वडार समाजाला' हा कवी कवितेतून देतो. कथात्मकता, आशयात्मकता ही कवी परशुराम गिमेकरांच्या कवितेचे बलस्थाने आहेत. सोपे, सहज पण हृदयाचा ठाव घेणारी कविता 'वडारवाडी'त वाचायला मिळते. भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे यांच्यासारखे उपेक्षितांचे दुःख व्यक्त करणारी कवी परशुराम गिमेकरांची 'वडारवाडी'तील कविता मोठी लक्षणीय आहे.

संदर्भ:

* चव्हाण, टी. एस. *वडार समाज: परंपरा व इतिहास*.

* पवार, सतीश. *वडार समाज आणि संस्कृती*. सेवा संस्था, २०१०.

* पाटोळे, सुरेश कृष्णाजी. *चोळी*. यशोदीप पब्लिकेशन्स, २०१९.

* गोळे, रवींद्र. *यमगरवाडीची गोष्ट*. विवेक प्रकाशन.

* गोळे, रवींद्र. *आयाबाया*. विवेक प्रकाशन.